# जाहिरात
Details on Website

मृद व जलसंधारण **विभाग, मंत्रालय, मुंबई.**

## अभियांत्रिकी (स्थापत्य), गट-अ (राजपत्रित) संवर्गातील सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार एकात्मिक राज्य जल आराखडयानुसार अपेक्षित व "विकसित महाराष्ट्र 2047" मधील निर्धारीत उद्दिष्टे यांची एकत्रित सांगड घालून प्रभावी अभिसरण, समन्वय व नियंत्रणाद्वारे, राज्य जल परिषदेस सल्ला देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्य जल व मृद संधारण व व्यवस्थापन समितीच्या (State Water and Soil Conservation and Management Committee) अत्यंत संवेदनशील व व्यापक कामकाजाच्या अनुषंगाने तांत्रिक मार्गदर्शन व **सहाय्य करण्यासाठी तांत्रिक तज्ञ म्हणून अभियांत्रिकी (स्थापत्य), गट-अ (राजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करावयाची आहे.**

अटी व शर्ती **:-**

1. **सदर नियुक्ती केवळ १२ महिन्यांच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं, (का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.**
2. **सदर करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी पात्रता, कामकाजाचे स्वरुप व अनुभव या बाबतचा तपशील खालील प्रमाणे** आहे :-

| अ. क्र. | पद | भरावयाची संख्या | पात्रता | मासिक पारिश्रमिक |
|---|---|---|---|---|
| 1 | तांत्रिक तज्ञ (स्थापत्य अभियांत्रिकी) | 1 | राज्य शासनाच्या प्रशासकीय विभाग/कार्यालयातील महत्वाच्या योजना राबवितांना तांत्रिक कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेले अभियांत्रिकी (स्थापत्य) गट-अ (राजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी. | सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार |

3. उमेदवारास मराठी भाषेचे चांगले ज्ञान असावे.
4. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.
5. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.
6. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.
7. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.
8. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
9. उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता संकेतस्थळ वरील माहिती पाहून vanita.pol@nic.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसांच्या आत करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी दूरध्वनीवर क्र. 022 22829163 संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त

झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

10. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही, तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

11. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

12. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस मृद व जलसंधारण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२ येथे काम करावे लागेल.

13. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

संपर्क **:- मृद व जलसंधारण** विभाग**, 716, 7 वा मजला,** मादाम कामा मार्ग**,** हुतात्मा राजगुरु चौक**,** मंत्रालय**,** मुंबई**-**४०० ०३२**.**

दूरध्वनीवर संपर्क : 022 22829163
ईमेल: vanita.pol@nic.in

आपली,

Digitally signed by
Vanita Sanjay Pol
Date: 13-07-2026
17:00:08

(वनिता पोळ)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

# अर्जाचा नमुना

**अभियांत्रिकी (स्थापत्य), गट-अ (राजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज**

| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

1) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-

2) अर्जदाराचा पत्ता :-

3) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-

4) भ्रमणध्वनी क्रमांक :-

5) जन्म दिनांक व वय :-

6) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

7) अनुभव :-

8) महाराष्ट्र शासनाच्या/ मृद व जलसंधारण विभागाच्या संकेतस्थळावर दि. ....................रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने .........................................या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहिरातीतील / सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

9) आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी